नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०४/२०२६ (बुधवार)

## अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या अरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १ आरोपी अटक,अग्निशस्त्र काडतुसासह ४७,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक ०१/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय माहीती मिळाली की, कन्हान गहु हिवरा पुलीया जवळ एक इसम देशी बनावटीचे अग्नीशस्त्र बाळगुन कोणतातरी हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत आहे. नमुद माहीती प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात गहु हिवरा रोड जवळील हायवे पुलाजवळ सापळा रचला असता, एक इसम संशयास्पदरीत्या फिरताना दिसुन आला.पोलीसांना पाहुन त्याने पळ काढला. त्याच्या वरील संशय अधिक बळावल्याने त्यास शिताफिने ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता आरोपी **अजीत राजू मनहरे, वय २४ वर्ष, रा. कामठी कॉलनी खदान नं. ३, ता. पारशिवनी जि. नागपूर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पंचासमक्ष आरोपीची अंगझडती घेतली असता आरोपीचे कमरेला देशी बनावटीचे पिस्टल (माउजर) हे अग्निशस्त्र मिळुन आले. अग्निशस्त्राच्या मॅगझीन मध्ये २ जिवंत काडतुसे मिळुन आली. सदर अग्निशस्त्राच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष १) १ देशी बनावटीचे पिस्टल (माउजर) किंमती ४५,०००/— रूपये, २) २ जिवंत काडतुसे किंमती २०००/— रूपये असा एकुण ४७,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस पोलीसांनी अटक केली आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.






# घरफोडी आणि वाहन चोरीचे एकुण ४ गुन्हे उघड, २ दुचाकी वाहनासह ८४,१४५/— रूपयाचा मुद्देमाल जप्त , कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक २५/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथे फिर्यादी अंकीत विजय कालरा, वय रा. जवाहर नगर, स्टेट बॅकचे मागे कन्हान, ता. पारशिवनी यांनी रिपोर्ट दिली की, फिर्यादी यांची विजय कॉम्प्लेक्स, ॲक्सीस एटीएम चे बाजुला ,अशोक नगर कन्हान येथे दुध डेअरी ची दुकान आणि फिर्यादीच्या दुकानाचे बाजुला ७ नंबर चे दुकान सिरील पॉल की फिश या दोन दुकानाचे शटर वाकवुन अज्ञान चोरटयांनी दोन्ही दुकानातुन एकुण ८७५०/— रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. नमुद रिपोर्ट वरून

पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३०३(२), ३३१(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात कन्हान पोलीस तपास करीत असतांना सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान दिनांक ०१/०४/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना रात्री पेट्रोलींग दरम्यान आंबेडकर चौक, कन्हान येथे दोन **विधीसंघर्षग्रस्त बालक हे संशयीत रित्या फिरतांना मिळुन आले. विधीसंघर्षग्रस्त बालक** यांना विश्वासात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता त्यांनी **पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत घरफोडी व नागपूर शहर पोलीस स्टेशन कोराडी, गिट्टीखदान, कपिल नगर परिसरात घरफोडी तसेच मोटर सायकल चोरी केल्याचे कबुल केले.**

पोलीसांनी पंचासमक्ष १) ०२ वेगवेगळया कंपनीचे अँड्रॉइड मोबाईल किंमती २०,०००/— रुपये २) ०२ मोटरसायकल किंमती ५०,०००/— रूपये ३) एक पेन ड्राईव्ह किंमती ३५०/—रूपये ४) एक कॅनरा बॅक चेक किंमती ७०,०००/— रूपये ने भरलेला ५) एक ॲमेरॉन बॅटरी वारंटी कार्ड ६) रोख रक्कम १३,७९५/—रूपये असा एकूण ८४,१४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

उघडकीस आलेले गुन्हे

१.पोलीस स्टेशन कन्हान अप क्र १६४/२०२६ कलम ३०५(अ), ३३१(४), ३(५) भा.न्या.सं.
२.पोलीस स्टेशन कपीलनगर अप क्र १८७/२०२६ कलम ३०५(अ), ३३१(४), भा.न्या.सं. ३. पोलीस स्टेशन कोराडी अप क्र १२१/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं
४.पोलीस स्टेशन गिट्टीखदान कलम ३०३ (२) भा.न्या.सं



## सराईत गुन्हेगार ओमप्रकाश उर्फ सचिन तेजराम गुजवार याला काटोल पोलीसांनी एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन काटोल :— पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील सराईत आरोपी नामे **ओमप्रकाश उर्फ सचिन तेजराम गुजवार, वय ३१ वर्ष, रा. गोन्ही, ता. काटोल जि. नागपूर** याचे वर चंदन झाडाची चोरी करणे, खुन करणे, अवैध्यरीत्या विनापरवाना दारू बाळगुन विक्री करणे तसेच अवैध अग्निशस्त्र बाळगने या सारखे अनेक गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित होता. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण

ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली काटोल पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार ओमप्रकाश उर्फ सचिन तेजराम गुजवार, वय ३१ वर्ष, रा. गोन्ही ता. काटोल जि. नागपूर याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता काटोल पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक ३१/०३/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेतले नमुद आरोपीला अटक करून कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.



सराईत गुन्हेगार ओमप्रकाश उर्फ सचिन तेजराम गुजवार

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
# वाहनासह ०२ लाख ५३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# भिवापूर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापूर :— दिनांक ३१/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत जवळी येथील नहराजवळ नाकाबंदी केली असता ट्रॅक्टर क्रं एम एच— ४०/सी एच — ८४०७ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रॅक्टरचा चालक नामे नितेश सखाराम देवाळकर, वय ३९ वर्ष, रा. वार्ड,क्र. ०३, भिवापुर जि. नागपुर हा मिळुन आला.** पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद ट्रॅक्टर क्रं एम एच— ४०/सी एच — ८४०७ किंमती २,५०,०००/— रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ३,०००/— रूपये असा एकुण २,५३,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी चालक नितेश सखाराम देवाळकर, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, भिवापुर जि. नागपुर याच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध २ गुन्हे नोंद, एमआयडीसी बोरी पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :— दिनांक ३१/०३/२०२६ रोजी एमआयडीसी बोरी पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता त्यांना अवैध जुगाराबाबत गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई करून २ गुन्हे नोंद केले.

१) मौजा टेंभरी येथे इंडोरामा कंपनीच्या गेट नं. ०३ समोर **आरोपी नामे करण दिलीपराव भजभुजे, वय २९ वर्ष, रा. रूईखैरी ता. जि. नागपूर** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन **करण दिलीपराव भजभुजे** याची झडती घेतली त्याच्या ताब्यातुन एका कागदी चिट्ठीवर एक सट्टापट्टीचे आकडे लिहीलेली व त्याचेवरती कल्याण असे लिहीलेली, पेन , नगदी ४००/— रुपये असा एकुण ४००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

२). मौजा बिडगणेशपुर येथे ममता हार्डवेअर च्या बाजुला आरोपी नामे **गुरू मंगल शेंडे, वय ४१ वर्ष, रा. सुकळी बेलदार, ता. हिंगणा जि. नागपूर** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी धाड टाकुन आरोपीच्या ताब्यातुन पंचासमक्ष एका कागदी चिट्ठीवर एक सट्टापट्टीचे आकडे लिहीलेली व त्याचेवरती कल्याण असे लिहीलेली, पेन , नगदी ३००/— रुपये असा एकूण **किमंती** ३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन्ही **आरोपीविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये प्रत्येकी १ असे २ गुन्हे नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २७ गुन्हे नोंद

दिनांक ३१/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, मोहाफुल व इतर साहित्य असा एकुण

३७,६८४/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन वेलतूर येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापूर येथे एकुण ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडी बोरी येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एकुण ०४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण ०४ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २७ नोंद केले आहे.

सदर कारवाईत १४०४० मिली देशी दारू, ४१४० मिली विदेशी दारू, १०९ लीटर मोहाफुल दारू, ४०० लीटर मोहाफुल रसायन सडवा, २० किलो ग्रॅम मोहाफुल तसेच इतर साहीत्य असा एकुण ३७,६८४/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने